**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ / फाल्गुन २५, १९४४ ( शके )**

**(१) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग,संसदीय कार्ये मंत्री**
**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

**सासवड, नारायणपूर, कापूरहोळ (ता.पुरंदर,जि.पुणे) येथील पीएन २५ या रस्त्याच्या प्रलंबित व निकृष्ट बांधकामाबाबत**

**(१) * ६२४७६ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील सासवड, नारायणपूर, कापूरहोळ पीएन २५ हा रस्ता हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल (हॅम) अंतर्गत सुरू असून सोलापूर, सातारा, बेंगलोर या राष्ट्रीय महामार्गाने जोडणारा मुख्य रस्ता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची अनेक कामे प्रलंबित असून निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे येथे अपघात होऊन भाविक, पर्यटक व वाहनचालक यांचा मृत्यु होत असून वित्तहानीही होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदर रस्त्याचे प्रलंबित काम, दर्जा व गुणवत्ता तपासुन दोषींवर कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्यावर हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत मंजूर लांबीपैकी काही लांबीमध्ये स्थानिकांनी घेतलेल्या हरकतीमुळे काम करणे शक्य झाले नसल्याने या लांबीतील काम, मंजूर कामाच्या वावामधुन वगळण्यात आले आहे.

सदर १२०० मीटर लांबीमध्ये ७ मी. रुंदीने कॉंक्रीटीकरणाचे काम मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले असुन निविदा प्रक्रीया पुर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

उर्वरित लांबीमध्ये रस्त्याचे काम करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०२२ मध्ये सदर रस्त्यावर वाहन चालकाच्या चुकीमुळे ४ अपघात झाल्याची नोंद सासवड पोलीस स्टेशन मध्ये आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जावडे पाटकरवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील लाकडी साकव धोकादायक स्थितीत असल्याबाबत**

**(२) * ५७४४४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जावडे-पाटकरवाडी (ता.लांजा,जि.रत्नागिरी) येथील रस्त्यावर पुल नसल्यामुळे बांधण्यात आलेला लाकडी साकव धोकादायक स्थितीत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी तहसिलदार, लांजा यांना वारंवार माहिती देऊनही सदर रस्त्यावर नवीन पूल बांधण्याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याने ग्रामस्थांना विशेषतः विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन लाकडी साकवावरुन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्यावर नवीन पुल बांधण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्यावर पूल बांधणेबाबत ग्रामस्थांनी तहसिलदार, लांजा यांना दि.०८.१२.२०२२ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

(३) प्रश्नाधीन साकव हा योजनाबाहय रस्त्यावर येत आहे. सदर ठिकाणी साकव बांधण्याकरीता जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांचेकडे दि.१७.०२.२०२३ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रस्ताव मंजूरी अंती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### ”टेट” परीक्षा घेऊन शिक्षक भरती करणेबाबत

**(३) * ५८८७५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर बंद असलेली शिक्षक भरतीची स्थगिती उठवून माहे फेब्रुवारी-मार्च, २०२३ मध्ये "टेट" परीक्षा आयोजित करून शिक्षक भरती करणार असल्याचे आश्वासन, मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा दरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमापन चाचणी (TAIT) आयोजित करून भरती करणेविषयी विभागाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने या परिक्षेचे संभाव्य वेळापत्रक एका सुनावणी दरम्यान मा.न्यायालयात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांमधील भरतीसाठी नियमांमध्ये बदल करण्यात आले असून उमेदवारांना प्रत्येकवेळी नव्याने होणारी 'टेट' परीक्षा देणे अनिवार्य केले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, असल्यास, यामध्ये उमेदवाराचे परीक्षेतील गुण नव्याने भरतीसाठी विचारात घेतले जाणार नसून शासनाने निर्णय घेवून पूर्वीप्रमाणे उमेदवाराला 'टेट' परीक्षेत मिळालेले गुण सुधारण्यासाठी संधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### लोटे ( ता. खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या साठवण टाकीतील गाळ काढण्याबाबत

**(४) * ५८८९४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे ता.खेड औद्योगिक वसाहतीमध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन विस्तार व आधुनिकीकरण करण्यात आलेल्या सामूहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (सीईटीपी) निष्क्रिय होऊन पाणी साचल्याने तेथील उद्योग संकटात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीईटीपी मधील गाळ काढण्याच्या कामात कारखानदारांना जाणीवपूर्वक वेठीस धरण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सीईटीपीमधील गाळ काढण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्रामधील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी) च्या साठवण टाकीमधील गाळ काढण्याचे काम माहे जानेवारी मध्ये मे. लोटे परशुराम एनव्हायरमेंट को. ऑप सोसायटी मार्फत सुरू करण्यात आले. सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामधील गाळ सुकविण्यासाठी सध्याच्या भुखंडावरील जागा अपुरी पडत असल्याने सदर संस्थेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे डी-सम्प येथील मोकळया जागेची मागणी केली होती. त्यानुसार महामंडळाने तात्पुरत्या स्वरूपात लोटे परशुराम येथील भुखंड क्र. पी-३१ यावर सीईटीपी गाळ सुकविण्यास सशर्त परवानगी दिली आहे. तथापि आवाशी ग्रामस्थांच्या विरोधामुळे गाळ टाकण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली होती. त्यामुळे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या साठवण टाकीमध्ये गाळ असल्याचे कारणास्तव दि.१५/०१/२०२३ ते १९/०१/२०२३ दरम्यान औद्योगिक क्षेत्रातून एकत्रित केलेले सांडपाणी सीईटीपी मध्ये सोडण्याच्या वेळेत कपात करण्यात आली होती.

सद्यस्थितीत गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत सांडपाणी प्रक्रिया करण्याचे काम सुरळीत सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सद्यस्थितीमध्ये मे. लोटे परशुराम एनव्हायरमेंट को. ऑप सोसायटी यांचे मार्फत गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले आहे व सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील केशरी शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात धान्यांऐवजी थेट रक्कम जमा करण्याबाबत

**(५) * ६२३८३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५९ हजार ते १ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना शासनाने २ रुपये किलो गहू आणि ३ रुपये किलो तांदूळ स्वस्त धान्य दुकानांतून देण्याची योजना सुरू केली होती व त्यास केंद्र शासनामार्फत देण्यात येणारे धान्य बंद करण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांना माहे जुलै २०२२ पासून गव्हाचे तर सप्टेंबर २०२२ पासून तांदळाचे वाटप बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमधील ४० लाख लाभार्थींना धान्याऐवजी बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महागाईच्या प्रमाणात दरमहा प्रत्येकी रु.१०००/- इतकी रक्कम देण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्यात सर्वत्र ही योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) राज्यातील औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याची योजना कार्यान्वित आहे. सदर शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांसाठी आवश्यक अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या Non-NFSA योजनेंतर्गत करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत अन्नधान्याची उचल थांबविण्यात येत असल्याचे भारतीय अन्न महामंडळाने कळविले आहे. त्यानुषंगाने सदर योजनेतील लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण (Direct Benefit Transfer- DBT) योजना दि. २८.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली असून त्या अंतर्गत प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१५०/- इतकी रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.
(४) १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही शिधापत्रिकाधारकांसाठी DBT योजना कार्यान्वित करण्याचा कोणताही प्रस्ताव सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बल्लारपुर (जि.चंद्रपूर) येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल व जैनुद्दीन जव्हेरी कॉन्व्हेंट, बामणी या शाळांकडे संलग्न प्रमाणपत्रच नसल्याबाबत

**(६) * ६११९६ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपुर (जि.चंद्रपूर) येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल व जैनुद्दीन जव्हेरी कॉन्व्हेंट मंडळ, बामणी या शाळांकडे संलग्न प्रमाणपत्र नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही संस्थाचालकांनी एकाच प्रमाणपत्रावर दोन ठिकाणी शाळा सुरु केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

पोदार इंटरनॅशनल स्कूल, दहेली ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर या शाळेला शासन निर्णय दि.२३ ऑगष्ट, २०१९ नुसार (इ.१ ली ते १२ वी इंग्रजी माध्यम सी.बी.एस.ई ) स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२०-२१ पासून इयत्ता १ ली इयत्ता ५ वी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ६ वी वर्ग सुरू असून एकूण ९५ एवढे विद्यार्थी प्रवेशित आहेत. तसेच जैनुद्दीन जव्हेरी कॉन्व्हेंट बामणी या शाळेला शासन निर्णय दि. २७ ऑक्टोंबर, २०१७ नुसार (इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी इंग्रजी माध्यमाचे सी.बी.एस.ई.) स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१९-२० पासून इयत्ता १ ली चा वर्ग सुरू करण्यात आलेला आहे. चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इयत्ता १ ते इयत्ता ४ थी वर्ग सुरू असून एकूण २१ एवढे विद्यार्थी प्रवेशित आहेत. सी.बी.एस.ई.च्या निकषांनुसार विद्यार्थी इयत्ता ९ वीत प्रवेश केल्यानंतर त्यांची नोंदणी सी.बी.एस.ई. कडे करणे आवश्यक आहे. त्यामुळे इयत्ता ९ वी मध्ये विद्यार्थी दाखल होतात तेंव्हा संबंधित शाळा मंडळ संलग्नतेकरीता प्रस्ताव सादर करतात. वरील दोन्ही शाळामध्ये अनुक्रमे इयत्ता ६ वी व इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग सुरू असून या शाळांनी मंडळ संलग्नता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर-गोंदिया राष्ट्रीय महामार्गावरील देव्हाडी उड्डाणपूलाची झालेली दुरवस्था

**(७) * ६२५०७ श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर-गोंदिया राष्ट्रीय महामार्गावरील देव्हाडी उड्डाणपुलाला अनेक मोठे तडे गेले असून दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या दरम्यान अपघातात तेथे एका मुलीचा जागीच मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या कामासाठी सुमारे ५० कोटी रुपये खर्च करण्यात येवूनही कंत्राटदाराने सदर काम निकृष्ट दर्जाचे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात मुंबईहून आलेल्या पथकाने पाहणी करुन सदरचा पुल वाहतुकीस योग्य आहे की अयोग्य याचा अहवाल पाठविणे अपेक्षित असतांना तसेच नागपूर येथील स्थापत्य अभियांत्रिकी तज्ञांनी पुलातील दगडाची ग्राऊटींग करण्याचे आदेश देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराशी संगनमत करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुलाच्या दुरुस्तीबाबत तसेच कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) रेल्वे उड्डाणपुलाला तडे गेलेले नसून, पुल सुस्थितीत आहे. सदर पुलाच्या पोचमार्गावर खड्डे पडले आहेत, हे खरे आहे. दिनांक १६-१२-२०२२ रोजी ट्रक चालकाने ट्रक भरधाव वेगात, हयगयी व निष्काळजीपणे चालविल्याने अपघात झाल्याची नोंद तुमसर पोलीस स्थानकात आहे.

(३) विश्वेश्वरया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (VNIT) नागपूर यांचेमार्फत सदर उड्डाणपुलाच्या पोचमार्गाच्या कामाचा सविस्तर तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर कामाच्या करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे संबंधीत कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) विश्वेश्वरया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (VNIT) नागपूर यांचेमार्फत सदर उड्डाणपुलाच्या पोचमार्गाच्या कामाचा सविस्तर तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील २३ शिक्षणाधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीबाबत

**(८) * ६०४७० ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय खाजगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये नवीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे नियम डावलून २०१२ ते २०१५ या कालावधीत शिक्षणाधिकाऱ्यांकडून शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्यात आल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमांचे उल्लंघन करून दिलेल्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणात एकूण २३ शिक्षणाधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात येणार असून त्यात माध्यमिकच्या १४ आणि प्राथमिकच्या नऊ शिक्षणाधिकाऱ्यांचा समावेश असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणास पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेला असून संबंधितांविरुध्द कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) अनियमित वैयक्तिक मान्यता देणाऱ्या १९ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व ९ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे विरूध्द शासनस्तरावरून विभागीय चौकशीचे ज्ञापन बजावण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली येथे स्टेरॉइड इंजेक्शन व इतर औषधांचे बेकायदेशीर वितरण होत असल्याबाबत**

**(९) * ६०७१३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शरीरसौष्ठवासाठी स्टेरॉइड इंजेक्शन व इतर औषधांची बेकायदेशीर विक्री व वितरण होत असल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारावर औषध प्रशासन विभागाने भगवती रुग्णालय, बोरीवली (मुंबई) येथे स्टेरॉइड इंजेक्शन व कामोत्तेजक औषधे देताना एका व्यक्तीस रंगेहाथ पकडण्यात आल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे हे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) आनंद भवन अपार्टमेंट १ ला मजला, प्लॉट न. २, एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) या ठिकाणी विनापरवाना औषध साठा केलेल्या प्रकरणांत ०८ औषधांचे नमूने विश्लेषणास्तव घेण्यात आले आहेत. सदर ठिकाणी उपलब्ध रु.५१,२६,५५४.३७/- किंमतीचा औषधी साठा जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी प्रथम खबर अहवाल क्रमांक ४३/२०२३, दि.२५.०१.२०२३ नुसार नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांमार्फत सुरू आहे. तपास पूर्ण करून संबंधिताविरुद्ध कायदेशीर कारवाई घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी एज्युकेशन सोसायटीमध्ये (जि.परभणी) येथे अवैध पदभरती केल्याबाबत**

**(१०) * ६१३६८ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी एज्युकेशन सोसायटीमध्ये (जि.परभणी) येथे बेकायदेशीर अध्यक्ष व सचिव यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन अवैध पदभरती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेत होत असलेला भ्रष्टाचार, अनियमितता व गैरप्रकार यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करावी यासाठी तेथील शिक्षकांनी मा. जिल्हाधिकारी परभणी यांना दिनांक १० जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) सदर तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास दि.१०.०१.२०२३ रोजी प्राप्त झाली असून, सदर निवेदन पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.२५.०१.२०२३ रोजी शिक्षणाधिकारी, परभणी यांच्याकडे पाठविले आहे.
(३) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी परभणी यांनी गट शिक्षणाधिकारी यांना चौकशी करणेबाबत आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील शाळांमध्ये महिनाभरापासून शालेय पोषण आहार पुरवठा बंद असल्याबाबत**

**(११) * ५८८३४ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या तसेच अनुदानीत इयत्ता १ली ते ८वी पर्यंतच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्याकरीता शासनाने शाळा व्यवस्थापनाच्या बँक खात्यात निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे गत एक महिन्यापासून शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहार तथा खिचडी उपलब्ध होऊ शकली नसल्याचे दिनांक ०४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय अन्न महामंडळाकडून तांदूळ नि:शुल्क देण्यात येतो, परंतु गेल्या महिन्यापासून तांदूळ न मिळाल्याने अडचण निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय पोषण आहार पुरवठ्याचे काम महिला बचत गटांना देण्यात यावे असे आदेश असताना जुन्या कंत्राटदाराकडे पुरवठा करण्याचे काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन निविदा काढण्यात आल्या नसून पोषण आहार वाटप विस्कळीत झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने तसेच शाळा व्यवस्थापनाच्या खात्यात तातडीने निधी जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे नागरी भागातील एकूण ६३ शाळांना सात बचत गटांमार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.
(४) व (५) शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरेदी समितीने सन २०२२-२४ करीता यवतमाळ जिल्ह्यासाठी तांदुळ वाहतुक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर ई-निविदा प्रक्रियेतून नियुक्त न्यूनतम निविदाधारकासोबत दि.०३ मार्च, २०२३ रोजी शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी करारनामा केला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा व अकोला जिल्ह्यामधील शहरी व ग्रामीण भागामध्ये गुटखा विक्री सुरू असल्याबाबत

**(१२) * ६२८०० श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असताना अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये सर्रासपणे गुटख्याची विक्री सुरू असल्याचे दिनांक ०९ जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुटखाबंदी ही केवळ कागदोपत्री असून अकोला येथे दररोज प्रतिबंधित माल येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक अन्न औषधे प्रशासन विभागाचे अधिकारी व पोलीस प्रशासनास याबाबत माहिती असूनही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी होणारी अवैध गुटख्याची विक्री रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

अकोला व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये गुटखा अथवा प्रतिबंधित अन्नपदार्थांची खुलेआम सर्रास विक्री सुरु असल्याची बाब दि. ०९.०१.२०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही. अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांच्यामार्फत गुटखा व इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या घटकांवर राज्यात वेळोवेळी अनेक कारवाया करण्यात येतात.

(४) अन्न व औषध प्रशासनाच्या अकोला कार्यालयामार्फत एप्रिल २०२२ ते आजतागायत प्रतिबंधीत अन्न पदार्थाच्या अनुषंगे एकूण १८१ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून त्यापैकी एकूण ११ प्रकरणी रु. ११,५७,४३८/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात असून सर्व प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.

तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या बुलढाणा कार्यालयामार्फत एप्रिल ते आजतागायत एकूण १३२ आस्थापनांच्या प्रतिबंधीत अन्न पदार्थांच्या अनुषंगाने तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी एकूण ०७ प्रकरणी अन्न व औषध प्रशासन व पोलीसांसह एकूण रु. १३,७३,६२०/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर सर्व प्रकरणी संबंधीत पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वायले नगर (ता.कल्याण,जि.ठाणे) येथे पोद्दार इंटरनॅशनल आंतरराष्ट्रीय शाळेने केंब्रीज बोर्ड (सीआयई) बंद केल्याबाबत

**(१३) * ६१४६६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायले नगर (ता.कल्याण,जि.ठाणे) येथे पोद्दार इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय शाळेने केंब्रीज बोर्ड (सीआयई) बंद करुन सदर विद्यार्थ्यांना सीबीएसई बोर्ड किंवा आयसीएससी बोर्डाचे शिक्षण घेण्याचा एकतर्फी निर्णय घेतल्याने सुमारे २०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचे दिनांक १६ जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळेने पालकांना विश्वासात न घेता, केंब्रीज बोर्ड बंद करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरीता सदरहू बंद केलेले केंब्रीज बोर्ड तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
दि.१६/०१/२०२३ रोजीच्या "पालक-शिक्षक संघटना" शाळेचे प्राचार्य व जनरल मॅनेजर यांच्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून शाळा बंद करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु पालकांचा आग्रह विचारात घेवून दि.१९/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत दि.१६/०१/२०२३ रोजीचा शाळा बंद करण्याचा प्रस्ताव संस्थेकडून मागे घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## भितारवाडी, चाफेवाडी आणि कोठेवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे पूल बांधण्याबाबत

**(१४)** * **५८७९५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भितारवाडी, चाफेवाडी आणि कोठेवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) या वाडयांकरिता चाफेवाडी येथे जिल्हा परिषदेची पाचवीपर्यंतची शाळा असून येथील विद्यार्थ्यांना नेहमीच शाळेत जाण्याकरिता नदीतून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळयात नदीच्या पाण्याची पातळी वाढत असल्याने अनेकदा विद्यार्थ्यांना शाळेत जाणे शक्य होत नसल्याने अथवा जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) सदर ग्रामीण मार्गावर प्रश्नांकित ठिकाणी पूल नसल्याने पावसाळया दरम्यान विद्यार्थ्यांना शाळेत जाणेकरीता अडचण होत आहे हे खरे आहे.
(३) गुंडे चाफयाचीवाडी भितारवाडी रस्ता ग्रा.मा.३५९ वर पुलाचे बांधकाम करणे ता.शहापूर जि.ठाणे हे काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाटूर-मंठा-चारठाणा (NH-७५२-I) या राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(१५) * ६३१५५ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाटूर-मंठा-चारठाणा (NH-७५२-I) या राष्ट्रीय महामार्गाचे काम संबंधित कंत्राटदाराने निविदा रकमेच्या ३८ टक्के कमी दराने घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाच्या बांधकामाकरिता डांबर कोट काढून काळी संपेपर्यंत खोदकाम करणे आवश्यक असताना केवळ अर्धा फूट खोल काम करून व साईड पट्टे न भरता काम निकृष्ट दर्जाचे करुन सदर कंपनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी पत्रव्यवहार करून देखील संबंधितांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित कंत्राटदार कंपनी व दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) प्रादेशिक अधिकारी, केंद्रीय रस्ते व राजमार्ग मंत्रालय यांनी सदर कामाच्या ३९.४५% कमी दराच्या निविदेस मान्यता प्रदान केलेली आहे.
(२) हे खरे नाही. सदर प्रकल्पासाठी निविदेतील अटी व शर्तीनुसार व आय.आर.सी. एस.पी. ७३: २०१८ नुसार रस्त्याचे प्लॅन आणि प्रोफाईल निश्चित करण्यात आले. म्हणून प्लॅन आणि प्रोफाईल नुसार आवश्यक ते खोदकाम प्रत्यक्षात करुन घेण्यात आले.
(३) हे खरे नाही.
लोकप्रतिनिधींच्या प्राप्त तक्रारीनुसार अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी सदरील कामाची तपासणी केली आहे. दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत कार्यवाही केली आहे.
(४) प्रादेशिक कार्यालयामार्फत दक्षता व गुणनियंत्रण मंडळाचा अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील तंत्रशिक्षण महाविद्यालयांनी अद्याप एन.बी.ए मुल्यांकन न केल्याबाबत**

**(१६) * ६२३३९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाशी व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था व महाविद्यालयांना एनबीए मुल्यांकन प्राप्त करुन घेणे बंधनकारक असून तांत्रिक व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने तशा सूचना दिल्या असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एन.बी.ए. मुल्यांकनात संबंधित संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती क्षमता व जागांची गरज इत्यादी बाबीची विकासात्मक नोंद करण्यात येते त्यामुळे ज्या संस्थांचा एन.बी.ए मानांकन कालावधी संपलेला आहे त्यांनी एन.बी.ए पुर्नमुल्यांकन करु घेणे आवश्यक असल्याने संबंधित संस्थांना महाविद्यालयांना शासनाने कळविले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने तशा सूचना वजा आदेश देऊनही राज्यातील अनेक तांत्रिक व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे तसेच येत्या सहा महिन्यात मुल्यांकन न केल्यास संचालक तंत्रशिक्षण (डीटीई) यांनी अशा संस्थाविरुध्द कारवाई करण्याचे आदेशही माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदेशानंतर किती संस्थांनी आतापर्यंत मुल्यांकन केले आहे व किती संस्थांनी अद्याप केलेले नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३), होय.

राज्यातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत/ विना अनुदानीत तांत्रिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील अभ्यासक्रमांना एन.बी.ए मानांकन व एन.बी.ए. पुनर्मुल्यांकन प्राप्त करून घेण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.६ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत.
(४) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील व्यावसयीक अभ्यासक्रमाच्या एकूण १५०२ शैक्षणिक संस्था आहेत. सदर संस्थांमध्ये एकूण ५९२१ अभ्यासक्रम (Courses) सुरु आहेत. या १५०२ संस्थापैकी १५६ संस्थांमधील ४७१ विविध अभ्यासक्रमांना (Courses) एन.बी.ए. मानांकन प्राप्त झाले आहे.

तसेच उर्वरीत संस्थांमधील अभ्यासक्रमांना (Courses) एन.बी.ए. मानांकन प्राप्त करुन घेण्याची प्रक्रीया संस्थास्तरावर सुरू आहे.

सद्यस्थितीत एन.बी.ए मानांकन व एन.बी.ए. पुनर्मुल्यांकन ६ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करून घेण्यात यावे, असे निर्देश तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.६ जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये दिलेले आहेत. त्यानुसार संस्थांकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद अकोला यांनी एका खाजगी शिकवणी वर्गाच्या प्रवेशासंदर्भातील कामे करण्याचे आदेश निर्गमीत केल्याबाबत

**(१७)** * **५७९९२ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशानुसार दिनांक २३ फेब्रुवारी,२०२२ रोजी जिल्हयातील सर्व मुख्याध्यापकांना एका खाजगी शिकवणी वर्गाच्या प्रवेशासंदर्भात कामे करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खाजगी शिकवणी वर्गाच्या संचालकाविरुध्द अल्पवयीन मुलींचे शोषण केल्याने कायदेशीर कारवाई देखील झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थी, आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, कोरोना मुळे मृत्यु पावलेल्यांचे पाल्य, शहीद सैनिकांचे पाल्य, अनाथ विद्यार्थी व गुणवत्ता धारक विद्यार्थी असे एकूण ७५ विद्यार्थ्यांना चौधरी कोचिंग क्लासेस तर्फे NEET/IIT-JEE चे मोफत शिक्षण देण्याकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी अकोला यांनी दि. २२/०२/२०२२ च्या परिपत्रकान्वये निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अकोला यांनी परिक्षेच्या नियोजनासंदर्भात सर्व मुख्याध्यापकांना दिनांक २३/०२/२०२३ च्या पत्रान्वये सूचना दिल्या होत्या.
(२) होय, हे खरे आहे.
(३) खाजगी शिकवणी वर्गाच्या संचालकाविरूध्द पोलिस स्टेशन, सिव्हील लाईन, अकोला येथे अप क्र.२६४/२२ कलम ३५४ (अ) (ब) (ड), ५०६ भा.दं.वि. सहकलम १०.१२ बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण अधिनियम ६७ (बी) आय.टी.ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोट विभाग यांनी केला आहे. गुन्ह्याचा तपास पुर्ण करून दोषारोप पत्र क्र. ४८३/२०२२ दि.१५/०७/२०२२ अन्वये तयार करण्यात येवून क्रि. केस क्र. ९९/२०२२ दि. १५/०७/२०२२ अन्वये न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही

-----------------

## पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डीडी येथील नवले पूल ते कात्रज रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत

**(१८) * ५७५४३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डीडीवरील नवले पुल ते कात्रज रस्ता सहापदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामामध्ये कुठेही सलगता नसून कंत्राटदार मनमानी पद्धतीने काम करत असतानाही संबंधित अधिकारी कोणतीच कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत संबंधित विभागास वारंवार पत्रव्यवहार, प्रत्यक्ष पाहणी आणि बैठकीच्या माध्यमातून केलेल्या सूचनांवर अद्याप कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर काम विहीत विनिर्देशानुसार प्रगतीत आहे व कामाची गुणवत्ता व दर्जा तपासणी वेळोवेळी करण्यात येत असून काम गुणवत्ता व दर्जा राखून करण्यात येत आहे.

(२) सदर कामाच्या जागेत असलेली महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेली पाण्याची पाईपलाईन वृक्षतोड परवानगी, मल:निस्सारण वाहिन्या तसेच इलेक्ट्रिकल लाईन स्थलांतरण करणे, विविध दूर संचार कंपन्याच्या ओ.एफ.सी. केबल लाईन्स इ. साठी ५ ते ६ यंत्रणांच्या समन्वयाने सदर रस्त्याचे काम करावे लागत असल्याने कामास विलंब झालेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिकमध्ये भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(१९) * ६२२४२ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मध्ये भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वाधिक भेसळ ही दुग्धजन्य पदार्थ खाद्य तेल व डाळी पासून बनविणाऱ्या खाद्यपदार्थांत होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याअगोदर मिठाई व नमकीनचे २६ नमुने, दुध व दुग्धजन्य पदार्थाचे ३५ नमुने, मैदा, आटा, रवा व बेसन ४५ नमुने, फरसाण, शेव व इतर अन्नपदार्थ ३२ नमुने असे एकुण १५१ नमुने तपासणीसाठी घेतले असता त्यापैकी ३१ प्रकरणांत दोष आढळल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाकडून नियमित दुकानदारांची तपासणी केली जात नसल्यामुळे भेसळीमध्ये वाढ होत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) हे खरे आहे.

नाशिक जिल्हयात भेसळयुक्त खाद्यपदार्थाची विक्री होत असल्याची बातमी दै. वृत्तपत्रामध्ये दिनांक २६/०१/२०२३ रोजी प्रसिध्द झाली होती. उपरोक्त प्रकरणी प्राप्त अहवालानुसार सर्वाधिक भेसळ ही दुग्धजन्य पदार्थात होत असल्याचे आढळून आले आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे,

सदरची आकडेवारी ही सणासुदीच्या मोहिमेतील असून, नाशिक जिल्हात या मोहिमेअंतर्गत खवा अन्न पदार्थाचे ४, मिठाई पदार्थाचे ५०, नमकिन/फरसान पदार्थांचे ८, खाद्यतेलाचे ४६, घी पदार्थांचे १०, व सणासुदीत वापरले जाणारे पदार्थ जसे मैदा, रवा, आटा इत्यादी असे उपरोक्त सर्व अन्न पदार्थांचे एकूण १४१ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. यातील १९ अन्न नमुने कमी दर्जाचे, ११ असुरक्षित तर १९ मिथ्याछाप घोषित करण्यात आले असून एकूण ४९ प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदयातील तरतूदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) भेसळीमध्ये वाढ होऊ नये तसेच नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये या दृष्टीकोनातून अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी विविध अन्न नमुने तपासणीच्या मोहिमा हाती घेऊन अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई घेण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदे अंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२०) * ६२७७३ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर तालुका (जि.जळगांव) येथील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असलेल्या रस्त्यांची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर गुणनियंत्रण पथकाने केलेल्या तपासणीत सदर कामे दर्जाहीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तपासणीनुसार संबंधित ठेकेदारावर अद्यापही कारवाई न करता सदर कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेकेदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद, जळगाव अंतर्गत मुक्ताईनगर तालुक्यामध्ये पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीत असलेल्या कामांवर माहे जानेवारी, २०२२ मध्ये निकृष्ट दर्जांच्या कामाबाबत विभागास तक्रार प्राप्त नाही.

(२), (३) व (४) मुक्ताईनगर तालुक्यातील दोन कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत संबंधिताविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षण सामग्री संच पुरविण्यासाठीच्या काढलेल्या निविदाबाबत

**(२१) *५८८७६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने राज्यातील शाळांसाठी प्रगत भाषा आणि गणित संकल्प नामक संसाधन शिक्षण सामुग्रीच्या संचाचा पुरवठा करण्याचे ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संच पुरवठा करण्याकरीता १९२ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकांच्या निविदाही काढण्यात आल्या परंतु काही कंपन्यांना त्याचा लाभ व्हावा म्हणून निविदेतील काही अटी व शर्तीमध्ये शिथिलता आणण्यात आली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निविदा भरलेल्या तीन कंपन्यांची स्वत:ची मुलभूत वेबसाईट देखील अस्तित्वात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर अट निविदेत अंतर्भूत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी व रायगड जिल्हयांना जोडणाऱ्या कशेडी घाटाच्या**
**पर्यायी भुयारी मार्गाच्या कामाबाबत**

**(२२) * ६२०३३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण कामामध्ये रत्नागिरी व रायगड जिल्हयांना जोडणाऱ्या कशेडी घाटाला पर्याय म्हणून भुयारी मार्ग तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भुयारी मार्गाचे काम केव्हा सुरू झाले व कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते तसेच सदर कामाची सदय:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) सदर भुयारी मार्गाच्या कामाचे कार्यारंभ आदेश हे दि.१५.१०.२०१८ मध्ये देण्यात आले असून दि. १४.०४.२०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि कोवीड-१९ या साथीच्या विविध निर्बंधांमुळे व भूसंपादन विषयक अडचणींमुळे सदर कामास नियोजित वेळेतपूर्ण होणेस विलंब झाला आहे.
सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम ८२ % पूर्ण झाले आहे, जोड रस्त्याच्या कॉक्रीटीकरणाचे काम प्रगतीत आहे. सदर काम हे माहे डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील दक्षता समितीत क्रियाशिल सदस्यांचा समावेश करण्याबाबत

**(२३) * ६३२२४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यात बहुतांश रास्तभाव रेशन दुकानांतून निकृष्ट दर्जाचे धान्य वितरीत करण्यात येत असून तालुक्यातील बऱ्याच गावांत रेशन दुकानदारांची मनमानी सुरू असताना दक्षता समित्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दक्षता समितीत निष्क्रिय सदस्यांऐवजी क्रियाशील व्यक्तींचा समावेश करण्याची मागणी विभागातील विविध संघटनांचे पदाधिकारी व नागरीकांनी मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री आणि जिल्हाधिकारी, जालना यांचेकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दक्षता समिती गठीत झाल्यापासून समितीतील अशासकीय सदस्यांची एकही बैठक झाली नाही तसेच बैठका घेतल्या जातात किंवा नाही, याबाबत जिल्हास्तरावरील अप्पर जिल्हाधिकारी यांनी खातरजमा सुद्धा केली नाही तसेच शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे, चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करणे, बनावट शिधापत्रिकांचा शोध घेणे, शिधापत्रिका न मिळालेल्या गरजू व्यक्तींना मदत करणे, गावांतील प्राप्त तक्रार नोंदवही तपासणे ही जबाबदारी देखील दक्षता समितीकडून पार पाडली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

ता.भोकरदन, जि.जालना येथील रास्त भाव धान्य दुकानांतून निकृष्ट दर्जाचे धान्य मिळत असल्याबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(२) याबाबतचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) सन २०२०-२१ या कार्यकाळामध्ये कोव्हीड महामारी मुळे राज्यात लॉकडॉऊन असल्यामुळे दक्षता समिती याची बैठक घेण्यात आलेली नाही.

शासन निर्णय, दि. १४.०९.२०२२ नुसार राज्यात ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या दक्षता समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या आदेशाच्या दिनांकापासून रद्द करण्यात आलेल्या आहे.

जिल्हा पुरवठा कार्यालय, जालना व तहसिलदार, भोकरदन यांच्याकडून शासनाने निर्धारीत केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे, चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करणे, बनावट खोटया शिधापत्रिकांचा शोध घेणे, शिधापत्रिका न मिळालेल्या गरजू व्यक्तींना मदत करणे, रास्त भाव दुकानातील तक्रार नोंदवही तपासणे ही कामे वेळोवेळी पार पाडली जातात.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिळंझे (ता. भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी पाडयांना जोडणारा पुल धोकादायक असल्याबाबत

**(२४) * ५८८३७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिळंझे (ता. भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील १६ आदिवासी पाड्यांना जोडणारा पुल वापराआधीच धोकादायक असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे काम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे केले असल्याने पुलाच्या प्लास्टरला तडे गेले असून रेतीऐवजी खडी पावडर वापरल्याने काँक्रिटीकरण निकृष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामपंचायतीने तक्रार करूनही सार्वजनिक बांधकाम खात्याने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन पुलाची दुरुस्ती करणेबाबत तसेच कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती,हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांना सदर कामाची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तपासणी अहवालातील निर्ष्कषानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहर व ग्रामीण भागातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत निकृष्ट व अपूर्ण पोषण आहार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत

**(२५) * ६२९६४ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर व ग्रामीण भागातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या निकृष्ट पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांची उपासमार होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला शहरातील २५ ते ३० शाळा प्रशासनांनी मनपा आयुक्त व माध्यमिक प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना पोषण आहार विद्यार्थी संख्येनुसार व निश्चित केलेल्या निकषाप्रमाणे मिळत नसल्याबाबत लेखी पत्राद्वारे कळवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय पोषण आहाराअंतर्गत केवळ तांदुळाचा पुरवठा करण्यात आला असून कंत्राटदारांनी अद्यापही इतर धान्य व वस्तू आहार पुरवठा शाळांना केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संपुर्ण पोषण आहार पुरवठा करण्याबाबत तसेच अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
याबाबत संबंधित शाळा प्रशासनाचे पत्र प्राप्त झाल्यानंतर उपायुक्त (प्रशासन), अकोला महानगरपालिका यांच्यामार्फत संबंधित आहार शिजवणाऱ्या यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे आहे.
अकोला जिल्ह्याकरीता राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेबाबत उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे माहे जानेवारी, २०२३ या महिन्याकरीता आवश्यक असणाऱ्या तांदुळ वाहतुकीचे काम मागील वर्षी नियुक्त असणाऱ्या पुरवठेदारास देण्यात आले होते. तसेच, इतर धान्यादी मालाच्या खरेदीस शासनाने निश्चित केलेल्या प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्चाच्या मर्यादेत अनुदान संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाद्यतेल भेसळ प्रकरणी कारवाई करण्याकरिता भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाचे परवाने राज्य शासनाकडून वितरीत करणेबाबत

**(२६) * ६१४६७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाद्यतेल भेसळ प्रकरणी तेल उत्पादकांकडे केंद्र शासनाच्या अखत्यारितील भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाचे (FSSI) परवाने असल्यामुळे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना थेट कारवाई करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू परवाने देण्याचे अधिकार राज्य शासनाकडे सोपविण्याची मागणी दिनांक ०८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास विविध राज्यांच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तांच्या बैठकीत करण्यात आली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईसह राज्यात गेले वर्षभरात मोठ्या प्रमाणात तेल भेसळ प्रकरणी धाडी टाकूनही थेट कारवाई करण्यास अडचणी येत असल्याने नागरीकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी तसेच अशाप्रकारे भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे देणेबाबत तसेच उपरोक्त बैठकीत केलेली मागणी मान्य करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिनांक ०६.०७.२०२१ व दिनांक ०२.१२.२०२१ रोजीचे आदेश क्रमांक १४(९)२०१७/ Authority Meeting /RCD/fssai नुसार केंद्रीय परवानाधारक आस्थापनावर कारवाई करण्याचे अधिकार केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी यांना असल्याचे सदर आदेशात नमूद आहे.

दिनांक ०५.१२.२०२२ रोजी खजुराहो येथे झालेल्या ३८ Central Advisory Committee च्या बैठकीमध्ये सदर मुददा उपस्थित करण्यात आला आहे. तथापि बैठकीच्या इतिवृत्तात त्याचा उल्लेख केलेला नाही.
(३) दि.२३.१२.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये केंद्रीय परवानाधारक आस्थापनावर कारवाईचे अधिकार राज्य शासनास देण्याबाबत अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांना आदेशित करण्याविषयी शासन स्तरावरून मा.मंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण यांना विनंती केली आहे, जेणेकरुन नागरिकांच्या हितांचे संरक्षण होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरगाणा (जि.नाशिक) येथील माणी वांगण पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(२७) * ६२३७९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) येथील माणी वांगण पुलाचे बांधकाम निकृष्ट होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे काम हे अर्थसंकल्प, २०२२-२३ लेखाशीर्ष ५०५४ टी-६ अंतर्गत मंजुर असून याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निकृष्ट बांधकामामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असून नागरिकांची देखील गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदरचे पुलाचे काम आदिवासी उपयोजनेत सन २०२१-२२ अंतर्गत रक्कम रु.२४५ लक्ष करीता मंजूर आहे. सदरचे काम करारनाम्यातील तरतूदी व विर्निदिष्ट मानकाप्रमाणे सद्यस्थितीत प्रगतीत असून जुलै, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील उड्डाणपुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२८) * ६२९६५ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात १६५ कोटी खर्च करुन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, अमरावती यांच्या औपचारिक नियंत्रणाखाली जिल्हा कारागृह ते अकोला क्रिकेट क्लब मैदानापर्यंत झांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने उड्डाणपुलाचे बांधकाम केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या निकृष्ट व दर्जाहीन बांधकामामुळे अशोक वाटिका चौकातील पुलावरील क्रश बॅरिअर अवघ्या ६ महिन्यातच निखळल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०२२ च्या त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या उड्डाणपुलाचे डिझाईन तीन वेळा बदलूनही या पुलाच्या सदोष बांधकामामुळे वाहतूकीदरम्यान त्यास तडा जाऊन सदरहू पिलर लोखंडाच्या पकडीच्या आधाराने उभा केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिलर निखळल्यामुळे संभाव्य जीवितहानी टाळण्याच्या दृष्टीने उड्डाणपुलावरून मुर्तीजापुरकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली असून ती अद्यापही सुरू करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन पुल दुरुस्ती तसेच झांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबतची शहानिशा न करता प्राधिकरणाच्या तात्कालीन अधिकाऱ्यांनी काम पूर्णत्वाचा दाखला दिल्याप्रकरणी चौकशी करून दोषी कंत्राटदार कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) मे.राम कुमार कॉन्ट्रॅक्टर व मे.जांडू कन्स्ट्रक्शन कंपनी (जेव्ही) यांनी रु.१६३.९८ कोटी किंमतीचे काम केले आहे.
(२) नाही.
सदर काम सुरु करण्यापुर्वी प्रचलित पध्दतीनुसार महानगर पालिका अकोला यांचे कडून अस्तित्वातील भुमीगत जलवाहिन्यांचे स्थलांतर करण्यास लागणारा खर्च, सदर प्रस्तावास सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी इ. बाबी व पर्यवेक्षकीय शुल्क महानगर पालिकेला भरल्यानंतर सदर काम पुर्ण करण्यात आले. उड्डाणपुलाच्या रॅम्पखालील भुमिगत जलवाहिनी फुटल्यामुळे सदर ठिकाणी रॅम्पमधील फ्लाय ॲश /मुरुम वाहुन गेल्याने क्रश बॅरीअरचा भाग खचला आहे.
(३) उड्डाणपुलाचे काम सुरु असताना ॲथॉरिटी इंजिनिअरच्या सल्ल्यानुसार कामाचे स्वतंत्र टेक्निकल ऑडीट व्ही.एन.आय.टी.च्या माध्यमातुन केलेले आहे व त्याचे सल्ल्यानुसार संकल्पन करुन काम पुर्ण केलेले आहे. त्यानंतर दुरुस्ती करुन मार्ग सुरु करण्यात येईल.
(४) क्रॅश बॅरिअर खचल्यामुळे तो मार्ग सद्यस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन बंद केला आहे. फुटलेली भूमीगत जलवाहिनी स्थलांतरीत केली आहे. खचलेल्या क्रॅश बॅरीअर पुन्हा करण्यासाठी कंत्राटदार विशिष्ट कार्यपध्दत सादर करणार आहे.

(५) या कामाची गुणवत्ता ही योग्य आहे व या कामात कुठलेही दोष नाहीत. पुर्णत्वाचा दाखला देताना कामाच्या पूर्ण चाचणी व परीक्षण करुन हा दाखला सक्षम प्राधिकारी यांच्या स्विकृतीनंतर ॲथोरिटी अभियंत्याने दिला आहे.   कामामध्ये कुठेही त्रुटी नसल्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.